# जाहीरात

महाराष्ट्र शासन

वनविभाग

---

जाहीरात क्रमांक ०१/२०१६.१७ दिनांक २५.०९.२०१६

वनविभागातील वनरक्षकांची (गट क संवर्ग) रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. त्यासाठी अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पद्धतीने https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरिता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पद्धतीनेच केलेले अर्ज व विहित चलनाद्वारे परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार प्रादेशिक निवड समिती, औरंगाबाद वनवृत्त, औरंगाबाद स्वत:कडे राखुन ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

**पदाचे नांव :- वनरक्षक**

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक २६.०९.२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून | दिनांक १९.१०.२०१६ संध्या ०५.०० वाजेपर्यंत |

बँकेत विहित चलनाद्वारे परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतीम दिनांक २०.१०.२०१६ राहील.

**१. निवड प्रक्रियेचे अंदाजित वेळापत्रक**

| **अ.क्र.** | **टप्पा** | **दिनांक** |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | विविध माध्यमातून प्रसिद्धी देऊन ऑनलाईन अर्ज मागविणे. वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्याची अंतिम तारीख. (निवड समित्यांनी वृत्तपत्रीय जाहीरातींद्वारे तसेच रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या | दिनांक २६.०९.२०१६ |

| | | |
|---|---|---|
| | संकेतस्थळावर तसेच स्थानिक रोजगार व्यवसाय मार्गदर्शन केंद्रामार्फत व्यापक पूर्वप्रसिद्धी करिता संबंधितांना कळविणे) | |
| २ | ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख. | दिनांक १९.१०.२०१६ |
| ३ | प्राप्त ऑनलाईन अर्जानुसार उमेदवारांची शारिरीक पात्रता तपासणीचा कार्यक्रम व ५ कि.मी/३कि.मी. धावण्याची चाळणी चाचणीचा कार्यक्रम प्रसिद्ध करणे. | दिनांक ०३.११.२०१६ |
| ४ | उमेदवारांची शारिरीक पात्रता तपासणे. (उंची,छातीचे माप व वजन) | दिनांक ०५.११.२०१६ ते दिनांक ०८.११.२०१६ |
| ५ | शारिरीक अर्हतामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची ५ कि.मी./३.कि.मी. धावण्याची चाळणी चाचणी घेणे. | |
| ६ | ५ कि.मी./३कि.मी. धावण्याची चाळणी चाचणी मध्ये नियमानुसार १:३ प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी तसेच प्रमाणपत्र तपासणी कार्यक्रम प्रसिद्ध करणे. | दिनांक १९.११.२०१६ |
| ७ | धावण्याची चाचणी मध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची शैक्षणिक व इतर अर्हता बाबत प्रमाणपत्र तपासणी करणे. | दिनांक २२.११.२०१६ ते दिनांक २५.११.२०१६ |
| ८ | उमेदवारांची शैक्षणिक अर्हता परीक्षेमध्ये प्राप्त गुणांचे ८७.०५% भारांकन **+** शासन पत्र दिनांक २१.०७.२०१४ अन्वये ५ कि.मी. / ३ कि.मी. धावण्याच्या चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांची बेरीज करुन निवड यादी तयार करुन जाहीर करणे.<br>(२५ कि.मी/१६ कि.मी. अंतर चार तासात पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता चाचणी पात्रतेच्या अधीन राहून) व शारिरीक क्षमता चाचणी करिता कार्यक्रम प्रसिद्ध करणे. | दिनांक ०३.१२.२०१६ |
| ९ | निवड झालेल्या उमेदवारांची चार तासात २५ कि.मी./ १६ कि.मी. अंतर पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता चाचणी घेणे. | दिनांक १०.१२.२०१६ ते दिनांक ११.१२.२०१६ |
| १० | चार तासात २५ कि.मी./१६ कि.मी. अंतर पूर्ण करण्याच्या शारिरीक क्षमता चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या निवड यादीतील उमेदवारास वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करण्यास कळविणे तसेच सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचेकडून वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र प्राप्त करणे. | दिनांक १२.१२.२०१६ ते दिनांक २६.१२.२०१६ |
| ११ | वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकारी यांनी उमेदवारांना वनरक्षक पदावरील नियुक्तीचे आदेश देणे. | दिनांक ३०.१२.२०१६ |

**टिप :-** (१) शारीरीक पात्रता तपासणी, धावण्याची चाचणी, कागदपत्र तपासणी व शारीरीक क्षमता चाचणी इत्यादी बाबत तारीख वरील वेळापत्रकाप्रमाणे असुन, स्थळ व वेळ mahaonline.gov.in संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

(२) वरील वेळापत्रक, स्थळ व वेळेमध्ये बदल झाला असल्यास जाहीरात नमूद वेबसाईट वर जाहीर करण्यात येईल.

**२. रिक्त पदसंख्या,वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, शारिरीक पात्रता इत्यादीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे**

## पदनाम : वनरक्षक (वर्ष २०१६ मधील भरती)

### नांदेड वन विभाग(अनुसूचीत क्षेत्राव्यतिरिक्त)

| विशेष/ समांतर आरक्षण | अ.जा | अ.ज | वि.जा.अ | भ.ज.ब. | भ.जक | भ.जड | विमाप्र | इमाव. | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| **एकुण पदे** | १ | - | - | - | १ | - | - | ३ | ५ | १० |
| सर्वसाधारण | १ | - | - | - | १ | - | - | २ | १ | ५ |
| महिला | - | - | - | - | - | - | - | १ | १ | २ |
| प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| होमगार्ड | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| वनविभागातील रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| **एकूण समांतर आरक्षण** | - | - | - | - | - | - | - | १ | ४ | ५ |

### औरंगाबाद वन विभाग (औरंगाबाद व जालना जिल्हा)

| विशेष/ समांतर आरक्षण | अ.जा | अ.ज | वि.जा.अ | भ.ज.ब. | भ.जक | भ.जड | विमाप्र | इमाव. | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| **एकुण पदे** | १ | - | - | - | - | १ | - | १ | ५ | ८ |
| सर्वसाधारण | १ | - | - | - | - | १ | - | १ | १ | ४ |
| महिला | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| होमगार्ड | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| वनविभागातील रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| **एकूण समांतर आरक्षण** | - | - | - | - | - | - | - | - | ४ | ४ |

## परभणी वन विभाग

| विशेष/ समांतर आरक्षण | अ.जा | अ.ज | वि.जा.अ | भ.ज.ब. | भ.जक | भ.जड | विमाप्र | इमाव. | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १२ | १३ |
| **एकुण पदे** | - | - | - | - | - | - | - | १ | १ | २ |
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | १ | १ | २ |
| महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| होमगार्ड | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| वनविभागातील रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण समांतर आरक्षण** | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

## बीड वन विभाग

| विशेष/ समांतर आरक्षण | अ.जा | अ.ज | वि.जा.अ | भ.ज.ब. | भ.जक | भ.जड | विमाप्र | इमाव. | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १२ | १३ |
| **एकुण पदे** | - | - | - | - | - | - | - | २ | २ | ४ |
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | १ | १ | २ |
| महिला | - | - | - | - | - | - | - | १ | १ | २ |
| प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| होमगार्ड | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| वनविभागातील रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण समांतर आरक्षण** | - | - | - | - | - | - | - | १ | १ | २ |

## उस्मानाबाद वन विभाग (उस्मानाबाद व लातूर जिल्हा)

| विशेष/ समांतर आरक्षण | अ.जा | अ.ज | वि.जा.अ | भ.ज.ब. | भ.जक | भ.जड | विमाप्र | इमाव. | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १२ | १३ |
| **एकुण पदे** | - | - | - | - | - | - | - | २ | २ | ४ |
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | १ | १ | २ |
| महिला | - | - | - | - | - | - | - | १ | १ | २ |
| प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| होमगार्ड | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| वनविभागातील रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण समांतर आरक्षण** | - | - | - | - | - | - | - | १ | १ | २ |

## हिंगोली वन विभाग

| विशेष/ समांतर आरक्षण | अ.जा | अ.ज | वि.जा.अ | भ.ज.ब. | भ.जक | भ.जड | विमाप्र | इमाव. | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १२ | १३ |
| **एकुण पदे** | १ | - | - | १ | - | - | - | १ | १ | ४ |
| सर्वसाधारण | १ | - | - | १ | - | - | - | १ | १ | ४ |
| महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| होमगार्ड | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| वनविभागातील रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण समांतर आरक्षण** | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

## नांदेड वन विभागातील अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीची रिक्त पदे

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक आरबी/टीसी/ई-१३०१३(४)/अधिसूचना-२/४७४/२०१४/७३०, दिनांक १४.०८.२०१४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील वनरक्षक संवर्गात रिक्त होणारी सर्व पदे स्थानिक अनुसूचित जमाती मधील उमेदवारांतून भरावयाचे आहेत. नांदेड वनविभागातील किनवट व माहूर तालुक्यातील काही गावे ही अनुसूचित क्षेत्रातील आहेत. इतर वनविभागात अनुसूचित क्षेत्र नाही.

| प्रवर्ग | एकुण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | | | सर्व-साधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त | भुकंपग्रस्त | माजी सैनिक | अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडू | होमगार्ड | अंशकालीन | रोजंदारी मजूर | |
| | | ३०% | ५% | २% | १५% | ५% | ५% | १०% | १०% | |
| स्थानिक अनुसूचित जमाती (किनवट व माहूर तालुक्यातील काही गावे ) | ९ | ३ | - | - | १ | - | - | १ | १ | ३ |

**<u>विशेष टीप</u>** : १.जाहीरातीत नमूद केलेली पदसंख्या सध्या रिक्त असलेल्या व डिसेंबर २०१६ अखेर पर्यंत रिक्त होणा-या पदांवर आधारित असल्याने सदर नियुक्ती या रिक्त पदांच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. या कारणास्तव जाहीरातीत उल्लेख केलेल्या रिक्त पदांची प्रवर्गनिहाय व एकुण संख्या परीवर्तनीय असून त्यामध्ये वाढ किंवा घट होऊ शकते.

२.नांदेड जिल्ह्यातील किनवट आणि माहूर तालुक्यातील काही गावे अनुसूचित आदिवासी क्षेत्र घोषित आहेत. या क्षेत्रातील रिक्त पदे स्थानिक आदिवासी उमेदवारांमधूनच भरावयाची आहेत. त्यामुळे उपरोक्त क्षेत्रांतील रहिवासी असलेल्या अनु. जमाती उमेदवारांचा प्राधान्याने या पदांसाठी विचार केला जाईल.

मा. राज्यपाल महोदयांच्या अधिसुचनेनुसार अनुसूचित क्षेत्रसतील भरती करावयाचे उमेदवार अनुसूचित जमातीचे असल्याने त्यांच्या अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र आणि अनुसूचित जमातीच्या वैधता प्रमाणपत्रावरुन, त्यांच्या मूळ ठिकाणाची प्रमाणित माहिती प्राप्त होते. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या स्थानिकतेची माहिती सदर प्रमाणपत्रावरुन घेण्यात येईल.

**३. वेतनश्रेणी** :- (रु. ५२००-रु.२०२००, ग्रेड पे.- रु. १८००)

**४. शैक्षणिक पात्रता** :-

(१) खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दिनांक २६.१०.२०१६ या दिनांकास प्रमाणपत्रासहित पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

(२) उमेदवाराने उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१२ वी) किंवा समकक्ष परीक्षा विज्ञान, गणित, भूगोल, अर्थशास्त्र यापैकी किमान एका विषयासह उत्तीर्ण केलेली असावी.

(३) अनुसूचित जमातीच्या उमेदवाराने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी) उत्तीर्ण केलेली असावी.

(४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएससी-२००५/(१४९/०५) उमाशि-२,दि.२०.०६.२००५ अन्वये इ. १२ वी च्या परीक्षेशी समकक्ष परीक्षांची यादी प्रसिद्ध करण्यात आलेली असून, सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००४२९१७०९४६००१ असा आहे.

(५) तथापि ज्या माजी सैनिकांनी माध्यमिक शालांत परीक्षा (१० वी) उत्तीर्ण केली असून किमान १५ वर्षे सैन्य सेवा केली आहे ते सुद्धा या पदासाठी अन्य आवश्यक अटी व शर्तीच्या अधीन राहून पात्र ठरतील.
(६) नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांच्या मुलांनी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केली असल्यास (इयत्ता १० वी) त्यांना या पदासाठी पात्र ठरविण्यात येईल.

टिप :- नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांचे संबंधात वरील प्रयोजनाकरिता शासकिय वैद्यकीय अधिकारी आणि पोलीस खात्यातील घटनेच्या कार्यक्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकारी यांचेकडून निर्गमित केलेले प्रमाणपत्र विचारार्थ घेण्यात यावे.

**५.वयोमर्यादा :-**
(१) उमेदवाराचे वय दिनांक २६ सप्टेंबर २०१६ रोजी १८ वर्षापेक्षा कमी नसावे व २५ वर्षापेक्षा जास्त नसावे. म्हणजेच उमेदवाराचा जन्म हा दिनांक २६ सप्टेंबर १९९८ नंतरचा नसावा व उमेदवाराचा जन्म दिनांक २६ सप्टेंबर १९९१ पूर्वीचा नसावा.

(२) **उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम.**
(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.
(दोन) माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.
(तीन) पात्र खेळाडूच्या बाबत ५ वर्षापर्यंत.
(चार) समांतर आरक्षणासाठी प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता तसेच मागासवर्गीय उमेदवाराकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.
(पाच) वनविभागातील अधिसंख्य वनमजुरांना व रोजंदारी मजुरांना वयोमर्यादेसंबंधी अट पुढीलप्रमाणे शिथिलक्षम आहे.
(सहा) **अधिसंख्य वनमजूरांकरिता** : वयाच्या ३३ वर्षानंतर (संबंधित) मजुर जेवढी वर्षे वनविभागात कार्यरत आहेत, तेवढ्या वर्षानी वयाची अट शिथील करण्यात आली आहे. उदाहरणार्थ ज्यांनी ५ वर्षे सेवा केलेली असेल त्यांना वयाच्या ३८ वर्षापर्यंत व ज्यांनी १२ वर्षे सेवा केली असेल त्यांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील करण्यात आली आहे.
(सात) **वनविभागातील रोजंदारी मजूरांकरिता** :- वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत.

**६. शारिरीक पात्रता.**

| शारिरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी.मध्ये) | १६३ | १५० |
| छातीचा घेर---<br>न फुगवता (से.मी.मध्ये)<br>फुगवून (से.मी.मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>---<br>--- |
| वजन (कि.ग्रॅ. मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

| अनुसूचीत जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम | | |
|---|---|---|
| उंची (से.मी.मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर---<br>न फुगवता (से.मी.मध्ये)<br>फुगवून (से.मी.मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>---<br>--- |
| वजन (कि.ग्रॅ. मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

(अ) उमेदवाराने दूरदृष्टी आणि जवळील दृष्टीचे व विना चष्म्याचे खालील निकष पूर्ण केले असावे

**<u>दूरदृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

**<u>जवळील दृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| J.१ | J.११ |

प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

(ब) शासकिय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापना व प्रशासन) यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा सामावेश राहील.

(क) शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.

नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररित्या जखमी झालेल्या वनखबरे व वनकर्मचा-यांचे मुलांना खाली नमूद केल्याप्रमाणे सूट देण्यात येईल.

१) उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ सें.मी.

२) छाती :- मोजणी आवश्यक नाही.

(ड) खेळाडू प्रवर्ग :- विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व वयोमर्यादेची अट पूर्ण् करणा-या खेळाडूंना, विहित उंचीमध्ये २.५ से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

(इ) वनकर्मचा-यांचे पाल्यांना शारिरीक अर्हतेत सवलत :- सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचा-यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारिरीक पात्रतेत खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

(ए) उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारास २.५ से.मी.

(बी) छाती :- पुरुष उमेदवारांना २.० से.मी. न फुगवता व १.५ से.मी. फुगवून

## निवडीची पध्दत :-

**७.** माहिती तंत्रज्ञान पद्धतीने (ONLINE) सादर केलेल्या अर्जातील माहितीनुसार पात्र ठरणा-या उमेदवारांची प्रथम किमान शारिरीक पात्रता (उंची,वजन इत्यादी) तपासण्यात येईल.

**८. किमान सापेक्ष उंची, वजन व छातीची मोजमापे :-**

शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४,दिनांक २४.०८.२०११ मधील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील परिशिष्ट-३ मध्ये महाराष्ट्र वन सेवेअंतर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांसाठी विहित केलेल्या उंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वनरक्षक या पदासाठीही उंचीच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील. वैद्यकीय तपासणी करणा-या व्यक्तींच्या मार्गदर्शनाकरिता सर्वसाधारण नियमानुसार पुरेशी मानली जाणारी किमान सापेक्ष उंची, वजन व छातीची मोजमापे दर्शविणारा तक्ता नमूद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**९. शारिरीक पात्रता तपासणी :-**

- वनरक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारिरीक पात्रता धारण करतात किंवा कसे, हे निश्चित करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकिय वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.
- तसेच उमेदवार हा शारिरीक क्षमता चाचणीकरिता शारिरीकदृष्ट्या सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित उमेदवाराने शासकिय वैद्यकीय अधिकारी यांचेकडून सोबत जोडलेल्या नमुन्यात प्राप्त करुन घेऊन धावण्याच्या चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**१०. धावण्याची चाळणी परीक्षा :-**

जे उमेदवार किमान शारिरीक पात्रता धारण करतात आणि ज्या उमेदवारांनी सुदृढतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले त्या उमेदवारांची पुढील प्रमाणे धावण्याची चाळणी चाचणी घेण्यात येईल. पुरुष उमेदवारास ५ कि.मी. व महिला उमेदवारास ३ कि.मी. धावण्याची चाळणी जास्तीत जास्त ३० मिनिटात पूर्ण करणे आवश्यक राहील. उक्त धावण्याची चाचणी परीक्षा स्पर्धात्मक व बाद पद्धतीची असले. धावण्याचे चाचणीमध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या ३ पट ऐवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील. उमेदवारांची संख्या निश्चित करतांना विहीत करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेऊन यादी तयार करण्यात येईल. या चाचणीत खालीलप्रमाणे गुणांचे भारांकन करण्यात येईल.

१. पहिल्या येणा-या ३ उमेदवारांस (क्र. १ ते ३ वर आलेले) प्रत्येकी-१० गुण
२. त्यानंतर येणा-या ५ उमेदवारांस (क्र.४ ते ८ वर आलेले) प्रत्येकी -०८ गुण
३. त्यानंतर येणा-या ७ उमेदवारांस (क्र.९ ते १५ वर आलेले) प्रत्येकी -०६ गुण
४. त्यानंतर येणा-या १० उमेदवारांस (क्र.१६ ते २५ वर आलेले) प्रत्येकी -०४ गुण
५. त्यानंतर येणा-या १५ उमेदवारांस (क्र.२६ ते ४० वर आलेले) प्रत्येकी -२.५ गुण

**११. कागदपत्रांची पडताळणी :-**

वरील फेरीत १:३ प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची विहित शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा इत्यादी प्रमाणपत्राची तपासणी करण्यात येईल.

१२. **गुणवत्ता यादी :-**

शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या टक्केवारीचे ८७.५ % भारांकन व उर्वरित १२.५ % भारांकनाकरीता उक्त अनुक्रमांक १० मधील धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण याची बेरीज करुन उमेदवाराची सामायिक गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**उदाहरणार्थ** :- श्री "क" या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता परिक्षा (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा मध्ये एकूण निर्धारित ५०० गुणापैकी ३०० गुण प्राप्त केले आहे. त्यांची टक्केवारी ६०% येईल, त्यांचे ८७.५ % भारांकन म्हणजे ५२.५० ऐवढे येईल. तसेच ५ कि.मी / ३ कि.मी. धावण्याच्या चाचणी परिक्षेत समजा तो ७ व्या क्रमांकावर आलेला आहे, तर उर्वरित १२.५% भारांकन करीता ८ गुण मिळतील. याप्रमाणे गुणवत्ता यादी करीता त्यास वरील अनुक्रमांक १० मधील सुत्रानुसार त्यांना मिळणारे गुण = ५२.५० + ८ = ६०.५० % अशा प्रकारे गणना केली जाईल.

गुणवत्ता यादी तयार करतांना इ. १२ वी मधील (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा) गुणांच्या आधारे, तथापि नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेले अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यू व जखमी झालेले वनखबरे व अशा वन कर्मचा-यांच्या मुलांसाठी इ. १० वी मधील (माध्यमिक शालांत परीक्षा) गुणांचा आधार त्याचप्रमाणे धावण्याच्या चाळणी परीक्षेतील प्राप्त गुणांचा आधार सामायिक गुणवत्ता यादी (common merit list) साठी घेतला जाईल.

**१३.चालण्याची क्षमता चाचणी :-** सामायिक गुणवत्ता यादीतून निवड यादीत आलेल्या (२५ कि.मी./१६कि.मी. अंतर चार तासात पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता चाचणी पात्रतेच्या अधिन राहून) पुरुष उमेदवारासाठी २५ कि.मी तर स्त्री उमेदवारासाठी १६ कि.मी. चालण्याची शारिरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल. उपरोक्त चाचणी ही चार तासांमध्ये पूर्ण करणे बंधनकारक राहील. या प्रयोजनार्थ उमेदवाराने सोबत जोडलेल्या नमुन्यात शासकिय वैद्यकीय अधिका-याकडून शारिरीक सदृढतेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**१४. निवडयादीत सामाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या :-**

**(महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिम-१०११/प्र.क्र.९९/११/१३-अ,दि.२६.१२.२०११)**

निवडसूचीमध्ये सामाविष्ट करावयाच्या प्रवर्गनिहाय उमेदवारांची संख्या खालील प्रमाणे असेल

| अ.क्र. | प्रवर्गनिहाय रिक्त पदांची संख्या | निवडसूचीमध्ये सामाविष्ट करावयाच्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय संख्या |
|---|---|---|
| १ | १० पदापर्यंत | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा सामावेश करावा. |
| २ | ११ ते ३० | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा परंतू किमान ८ इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा सामावेश करण्यात यावा. |
| ३ | ३१ व त्याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा परंतू किमान १० इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा सामावेश करण्यात यावा. |

वरील प्रमाणे अतिरिक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करतांना उमेदवारांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील संख्या विचारात घेण्यात येईल. त्याच प्रमाणे निवडसूचीसाठी रिक्त पदांची संख्या
विचारात घेतांना अर्ज स्वीकारण्याच्या अंतीम तारखेपर्यंत निवड समितीकडे लेखी स्वरुपात प्रत्यक्ष मागणी प्राप्त झालेले असेल, तितकीच रिक्त पदे निवडसूचीसाठी विचारात घेण्यात येतील.

**१५. निवडयादीची कालमर्यादा :-**

निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यात जी रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल ते विधिग्राह्य ठरेल. त्यानंतर ती निवडसूची व्यपगत होईल. निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधुन ज्येष्ठतेनुसार उमेदवरांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर केलेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबंधित पदांच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जाती प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवारांची मागणी नियुक्ती प्राधिकारी निवड समितीकडे करेल. अशी मागणी आल्यावर निवड सूचीच्या विधिग्राह्यतेच्या अधिन राहून सदर निवडसूचीमधून उमेदवारांची शिफारस करण्यात येईल.

**१६.सर्वसाधारण अटी :-**

(१) सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

(२) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

(३) "महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भुकंप-१००९-प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७.०८.२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले ५ % समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वंतत्रपणे २% समांतर आरक्षण लागू राहील."

(४) सामान्य प्रशासन विभाग परिपत्र क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८१/१३-अ दिनांक १६.०३.१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाचा प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा.,अ.ज.,वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र. इ.मा.व., आरक्षणानुसार होणा-या राखीव पदाची संख्या पदाचा तपशिल या शिर्षातंर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर पदे त्या सामाजिक प्रवर्गातून भरण्यात येतील.

(५) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र. इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सी.बी.सी.-२०१२/प्र.क्र.१८२/विजा.भज.-१, दिनांक २५ मार्च २०१३ मधील तरतुदीनुसार त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर), दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत वैध असलेले, विहित नमुन्यातील सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. याचा विहित नमुना

शासन परिपत्रक सामान्य न्याय, सांस्कृतिक न्याय व विशेष सहाय विभाग क्र.सी.बी.सी.-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५ दिनांक ३०.०६.२००६ दिलेला आहे.

(६) महिला उमेदवारांकरिता :-

(i) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/ कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिला साठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, वि.जा.(अ), भ.ज.(ब.), भ.ज.(क.), भ.ज.(ड.) व विमाप्र या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

(ii) मागासवर्ग प्रवर्गातील इतर मागासवर्ग, वि.जा.(अ), भ.ज.(ब.), भ.ज.(क.), भ.ज.(ड.) व विमाप्र या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांनी महिलांच्या ३० टक्के आरक्षणासाठी क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१.०३.२०१७ या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची मूळ प्रत अंतीम निवडीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

(७)खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू उमेदवारांना खेळाडुंसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय असणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूंचे ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

(८)जिल्हा रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयांकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर विहित केलेल्या पद्धती प्रमाणे अर्ज सादर करावा.

(९) वनविभागात कार्यरत असलेल्या सर्व अधिसंख्य वनमजूरांनी व रोजंदारी मजूरांनी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहेत त्या पदाकरिता विहित केलेल्या पद्धती प्रमाणे अर्ज सादर करावा.

(१०) अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी तसेच अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही

(११) पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहीरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपूर्ण अधिकार निवड समितीला आहेत.

(१२) सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

(१३) उमेदवारांना धावण्याच्या चाळणी चाचणी परीक्षेकरिता,कागदपत्रे पडताळणी करिता तसेच चालण्याच्या शारिरीक क्षमता परीक्षेकरिता कोणत्याही प्रकारचा भत्ता व प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

(१४) होमगार्ड आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी होमगार्ड मध्ये कमीत कमी ३ वर्षे इतकी सेवा झालेली असावी तसेच विहित शैक्षणिक/शारिरीक/वयोमर्यादा या अटी पूर्ण केलेल्या असाव्या.

(१५) “सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय” या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना १०% समांतर आरक्षण लागू आहे. त्यांना सध्याच्या ४५ वर्षे मर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करुन सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येईल.

**१७. परीक्षाशुल्क :-**

उमेदवारांनी **ONLINE** पध्दतीने अर्जानुसार सेवाशुल्क खालीलप्रमाणे भरणा करावे.

| **प्रवर्ग** | **शुल्क** |
|---|---|
| **खुला** | **रु. ३००/-** |
| **मागासवर्गीयां करीता/ राखीव प्रवर्ग** | **रु. १५०/-** |

ONLINE पध्दतीने प्राप्त केलेली चालान **भारतीय स्टेट बॅंकेच्या** च्या कोणत्याही शाखेमध्ये जाऊन भरणा करावी व चालानची प्रत अर्जदाराने जपून ठेवावी. वनविभागाने मागणी केल्यास ती सादर करणे आवश्यक राहील.

**१८. अर्ज करण्याची पध्दत :-**

(१) अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

(२) पात्र उमेदवाराला ऑन लाईन अर्ज maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईटव्दारे दिनांक २६/९/२०१६ ते १७/१०/२०१६ या कालावधीतच सादर करणे आवश्यक आहे.

(३) ७.३ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चा फोटो (३ से.मी. x ४.५से.मी.), त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करुन (रुंदी ३ से.मी. X उंची २.५ से मी ) आणि ३०० DPI Resolution आणि ५० के.बी पेक्षा कमी साईज होईल अशा पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. ( फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी. प्रवेश पत्रावर/अर्जावर दुस-याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.

(४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या सविस्तर सुचना maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(५) विहीत पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर विहीत मुदतीत परिक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

(६) अर्ज ऑन लाईन अथवा महा ई सेवा केंन्द्राव्दारेच भरता येईल. महा ऑन लाईन लिमीटेड या संस्थेकडून प्रतैयक जिल्हयात महा ई सेवा केंन्द्र उभारण्यात आले आहे या महा ई सेवा केंन्द्राची यादी www.mahaonline.gov.in किंवा maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(७) उमेदवारांनी यापुर्वी maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाइटवर आपले खाते तयार केलेले असल्यास नव्याने खाते तयार करण्याची गरज नाही.

(८) त्यानंतर उमेदवारास प्रोफाईल निर्मीती मध्ये जाऊन स्वत:ची संपुर्ण माहिती भरावी लागेल. maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईटवर यापुर्वी प्रोफाईल निर्मीतीमध्ये जाऊन स्वत:ची प्रोफाईलमधील माहिती कधीही अद्यावत करु शकतो.

(९) उमेदवाराने युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉगीन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंकवर क्लीक करावे. त्या कार्यालया अंतर्गत उपलब्ध जाहीराती अर्ज करण्यासाठी येथे क्लीक करा या संदेशासह दाखविल्या जातील.

(१०) क्लीक केल्यानंतर उमेदवार जाहीरातीत नमुद शैक्षणीक पात्रता/इतर बाबीची पुर्तता करत असेल तर अर्ज स्विकारला जाईल अन्यथा अर्ज अधिकृत ठरेल.

**आवेदनशुल्क खालील दिलेल्या पर्यायानुसार अदा करता येईल.**

**१) भारतीय स्टेट बॅकमध्ये चलानव्दारे २) नेट बॅकींग ३) डेबीट कार्ड**

**१९. परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी खाली नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा :-**

(१) युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉगीन केल्यानंतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील माझे खाते या लिंकवर क्लीक करावे.

(२)माझे खाते या लिंकवर क्लीक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केल्ल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/ न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. पदासमोर Unpaid असे लिहीलेले असेल त्या ठिकाणी Pay Now अश लिंक उपलब्ध असेल.

(३)Pay now या लिंकवर क्लीक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील १) ऑन लाईन पेमेंट २) चलानव्दारे

(४) उमेदवारांने चलानव्दारे हा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या चलानाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बॅक कोणत्याही शाखेत, बॅकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(५) चलानव्दारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बॅक उमेदवारांकडून परिक्षा शुल्का व्यतिरिक्त सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चालानव्दारे शुल्क भरतांना शुल्क अधिक (बॅकेचे सेवा शुल्क) भरावे लागेल.

(६)) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बॅकमध्ये चलानव्दारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बॅकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(७) विहीत पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही तसेच भारतीय स्टेट बॅकेमध्ये चलानव्दारे परिक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास ऑन लाईन चालानची प्रत प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही दिनांक १७.१०.२०१६ रोजी संध्याकाळी ५-००वाजेपर्यन्त पुर्ण करणे आवश्यक आहे, त्यानंतर सदर वेब लिंक बंद होईल.

(८) चालानव्दारे परिक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बॅकेमध्ये १८/१०/२०१६ पर्यन्त बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहीत दिनांकानंतर परिक्षा शुल्क भरल्यास वैध मानल्या जाणार नाही. तसेच परिक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**२०.**शारीरिक तपासणी व धावण्याची चाळणी चाचणी पूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्यांच्या माझे खाते मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परिक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व शारीरिक तपासणीचे/ धावण्याची चाळणी चाचणीचे वेळी त्याची प्रत उमेदवाराने सोबत आणने सक्तीचे आहे. त्याशिवाय प्रवेश दिल्या जाणार नाही.

(१) अर्ज भरण्यासंबंधी हॉल टिकीट (परिक्षा प्रवेशपत्र) उपलब्धतेसाठी ई तत्सम बाबीसाठी maharecruitment.mahaonline.gov.in संकेतस्थळावर संपर्क करावा. त्याचप्रमाणे अर्ज भरण्यास काही अडचण असल्यास ०२२/६१९१६४०० या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

(२) ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

(३) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा/वेळापत्रक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या संकेतस्थळा वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**२१. भरती बाबत अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना :-**

(१) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

(२) निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण घेणे, विभागीय परीक्षा, विहित केलेल्या भाषेची परीक्षा तसेच संगणक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(३) वनरक्षक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी वनविभागाच्या कोणत्याही राज्य वनरक्षक प्रशिक्षण विद्यालयातून चालविण्यात येणारा वनरक्षकांचा सहा महीन्यांचा वनरक्षक अभिक्रम प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक राहील व सदर पाठ्यक्रम प्रशिक्षणासाठी घेण्यात येणारी परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(४) आरक्षित पदांकरिता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र शासन निर्णय बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दिनांक १२.१२.२०११ चे प्रचिलित शासन नियमानुसार सहा महिन्यांचे आंत सादर करणे आवश्यक राहील.

(५) उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशिला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

(६) निवड झालेल्या उमेदवारांची औरंगाबाद वनवृत्त अंतर्गत ग्रामीण व दुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकते.

(७) पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारिरीकदृष्ट्या इजा पोहोचल्यास अथवा नुकसान झाल्यास शासन जबाबदार राहणार नाही.

(८) वनरक्षक पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. एफएसटी०३/१५/प्र.क्र.१५६/फ-४दिनांक०६.०८.२०१५ मधील तरतुदीनुसार विशिष्ट कारण असल्याशिवाय आंतरवृत्तीय बदली होणार नाही. याची नोंद संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

(९) तसेच वनरक्षक पदावर नियुक्ती सामाजिक आरक्षणानुसार बिंदुनामावली प्रमाणे केली जाणार असल्यामुळे उमेदवारांची आंतरविभागीय बदली होणार नाही याची नोंद संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

दिनांक : २५.०९.२०१६
औरंगाबाद :

सदस्य सचिव
प्रादेशिक निवड समिती,
औरंगाबाद वनवृत्त, औरंगाबाद

## <u>लहान कुटुंबासाठी प्रतिज्ञापत्र</u>

**<u>नमुना-अ</u>**

**(नियम-४)**

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------ श्री ----------------------

यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ------ वर्ष --------- राहणार ----------------------------

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी -------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला-----------------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८.०३.२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या आहे (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असले तर दिनांक २८.०३.२००५ वा तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :- **अर्जदाराची स्वाक्षरी**

स्थळ :- **नांव :-**

## <u>उमेदवाराने द्यावयाचे वचनपत्र</u>

**<u>(सदर वचनपत्र उमेदवाराने धावण्याची चाळणी चाचणी दरम्यान सोबत आणावे.)</u>**

वनरक्षक पदभरती २०१६-१७ मध्ये मी खालील सही करणार वचनपत्र लिहून देतो की, वनरक्षक पदभरती २०१६-१७ मध्ये मी उमेदवार म्हणून आवेदनपत्र दाखल केले आहे. उपरोक्त भरती प्रक्रियेचा भाग म्हणून धावण्याची चाळणी चाचणीमध्ये ५.०० कि.मी. (पुरुष उमेदवारास) /३.०० कि.मी. (स्त्री उमेदवारास) अर्ध्या तासात पूर्ण करण्याच्या धावण्याची चाळणी चाचणीत स्वेच्छेने सहभागी होत आहे. सदरहू धावण्याची चाळणी चाचणीकरिता मी शारिरीकदृष्ट्या सक्षम आहे. उपरोक्त धावण्याची चाळणी चाचणी दरम्यान माझी शारिरीक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास, त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

करिता हे वचनपत्र लिहून देण्यात येत आहे.

स्थळ :- उमेदवाराचे नांव

ठिकाण :-

दिनांक :-

**<u>उमेदवाराने द्यावयाचे वचनपत्र</u>**

**<u>(सदर वचनपत्र उमेदवाराने चालण्याची शारिरीक क्षमता चाचणी दरम्यान सोबत आणावे.)</u>**

वनरक्षक पदभरती २०१६-१७ मध्ये मी खालील सही करणार वचनपत्र लिहून देतो की, वनरक्षक पदभरती २०१६-१७ मध्ये मी उमेदवार म्हणून आवेदनपत्र दाखल केले आहे. उपरोक्त भरती प्रक्रियेचा भाग म्हणून चालण्याची शारिरीक क्षमता चाचणीमध्ये २५.०० कि.मी. (पुरुष उमेदवारास) /१६.०० कि.मी. (स्त्री उमेदवारास) चार तासात पूर्ण करण्याच्या चाचणीत स्वेच्छेने सहभागी होत आहे. सदरहू चाचणीकरिता मी शारिरीकदृष्ट्या सक्षम आहे. उपरोक्त शारिरीक क्षमता चाचणी दरम्यान माझी शारिरीक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास, त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

करिता हे वचनपत्र लिहून देण्यात येत आहे.

स्थळ :- उमेदवाराचे नांव

ठिकाण :-

दिनांक :-

## वनरक्षक भरती सन २०१६

## शारीरिकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री/श्रीमती -- - - - - - - - - - - -- - - - - -- - - - -- - -- - - - राहणार मु पो. - - - - - - - - - - - - - -ता.- - - - - - - - - - - जिल्हा - - - - - - - - -- - - हे औरंगाबाद वनवृत्तासाठी वनरक्षक भरती सन २०१६ मधील **धावण्याचे चाचणीकरीता** आवश्यक असलेले पुरुष ५ कि.मी. /महिला ३ कि.मी. ३० मिनिटात पूर्ण करणेस शारीरिकदृष्टया सुदृढ आहेत.

दिनांक :- शासकिय वैद्यकिय अधिका-याचे नांव
ठिकाण :- पदनाम व शिक्क

*लागु नसलेला मजकूर खोडावा

## वनरक्षक भरती सन २०१६

## शारीरिकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री/श्रीमती -- - - - - - - - - - - -- - - - - -- - - - -- - -- - - - राहणार मु पो. - - - - - - - - - - - - - -ता.- - - - - - - - - - - जिल्हा - - - - - - - - -- - - हे औरंगाबाद वनवृत्तासाठी वनरक्षक भरती सन २०१६ मधील **शारीरीक क्षमता चाचणी** करीता आवश्यक पुरुष २५ कि.मी./ महिला १६ कि.मी. ४ तासामध्ये पूर्ण करणेस शारीरिकदृष्टया सुदृढ आहेत.

दिनांक :- शासकिय वैद्यकिय अधिका-याचे नांव
ठिकाण :- पदनाम व शिक्क

*लागु नसलेला मजकूर खोडावा